क्रमांक ए/गटबांधणी/८७
मुंबई, दिनांक ३ /२/१९८७

परिपत्रक

विषय/-सदोष गटबांधणीमुळे योजनेवर
येणा-या अर्जासंबंधी...

एकत्रिकरण अधिकारी/सहा.एकत्रिकरण अधिकारी यांचेकडून येणा-या जमीन एकत्रिकरण योजनांची तपासणी करतांना असे दिसून आले की, जमिनींच्या अदलाबदली संबंधी जे जबाब घेतले जातात, त्यावर त्यांच्या [खातेदारांच्या]सहया घेवूनही ते जबाब ब-याच प्रमाणांत अपूर्ण असतात. अदलाबदली संबंधी सर्व हिश्या-चे क्षेत्र जबाबांत नमूद केलेले नसते. तसेच योजनेपूर्वीचे संबंधीत खातेदाराचे एकूण क्षेत्र व योजनेनंतर त्यांना देण्यांत येणा-या एकूण गटांचे क्षेत्र कांहीवेळा जबाबांत दर्शविले जात नाही. नवीन पोट हिस्सा मोजणीचे व पैकी हिश्याचे क्षेत्र अदला-बदलीचे जबाबाचेवेळी उपलब्ध होत नाही. त्यामुळे जबाबात त्याचा तपशील कोरा ठेवला जातो. हया उणीवा/जबाबांत राहणे योग्य नाही. तयार केलेले गट सर्व संबंधीत खातेदारांना जागेवर प्रत्यक्ष समजावून सांगावेत व योजनेपूर्वीचे व योजनेनंतर-चे त्यांचे क्षेत्र त्यांना समजावून सांगावे. गटरचना करतेवेळी कमी/जास्त क्षेत्र दिल्याबाबत ते तसे कां दिले जाते याचा जबाबांत स्पष्ट दाखला देवून व खातेदारां-ना स्पष्ट कल्पना देवून मगच जबाबावर संबंधीत खातेदारांच्या संमतीदर्शक - स्वाक्षा-या घ्याव्यांत.

योजनेपूर्वीची जमीन व नंतर त्यांना दिलेली जमीन यामध्ये विहीत प्रमाणापेक्षा जादा क्षेत्र/आकारांत फरक येत असेल तर अशा खातेदारांशी एकत्रिकरण अधिका-री यांनी संपर्क साधून त्या संबंधी जबाबावर सविस्तर दाखले ठेवावेत. याबाबत एकत्रिकरण अधिकारी यांनी अदलाबदल समतोल झालेबद्दल स्वत: खात्री करुन घ्यावी व तशा अर्थाचे शेरे एकत्रिकरण अधिकारी यांनी जबाबावर ठेवावेत.

तसेच सहा.एकत्रिकरण अधिकारी यांनी गांवचे अधिकार अभिलेखांतील जमीन एकत्रिकरण योजना सुरु होणेपूर्वीच्या एक वर्षाच्या नोंदीचे कामांत नियमा-नुसार निर्णय घेवून त्याप्रमाणे संबंधीत गावाचे श्र्क्र अधिकार अभिलेख मेळांत आणून जमीन एकत्रिकरण योजनेत त्यांचा अंमल घेवून पूर्तता करण्याची दक्षता घ्यावी.

वरील मुद्यांचे कामी कार्यवाही करणेस एकत्रिकरण अधिकारी/सहा.एकत्रिकरण अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्यास व त्यामुळे जर योजनेवर अधिकार अभिलेखासंबंधी तक्रारी अर्ज आलेस संबंधीत सहा.एकत्रिकरण अधिकारी/एकत्रिकरण अधिकारी यांना जबाबदार धरणेत येईल व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल. तरी या सूचनांची अंमलबजावणी बिनचूकपणे केली जाईल याकडे सर्वांनी लक्ष पुरवावे.

[ वि.गं. भिडे ]
उपसंचालक भूमि अभिलेख,
कोंकण प्रदेश, मुंबई.

कुअगा.